# पर्यावरणीय आणि सामाजिक सुरक्षेचा विचार व्हावा



डॉ. गुरुदास नूलकर

**'पर्यावरण, वने आणि हवामानबदल मंत्रालया'ने 'पर्यावरण प्रभाव मूल्यांकन' (ईआयए) अधिसूचनेचा मसुदा जाहीर केला आहे. मसुद्यातील काही बाबींमध्ये सुधारणा झाल्या पाहिजेत, असे वाटते. पर्यावरणीय आणि सामाजिक सुरक्षेच्या दृष्टीनेही या बाबी महत्त्वाच्या वाटतात.**

'पर्यावरण, वने आणि हवामानबदल मंत्रालया'ने १२ मार्च २०२० रोजी 'पर्यावरण प्रभाव मूल्यांकन' (ईआयए) अधिसूचनेचा मसुदा सादर केला आणि पुढच्या ६० दिवसांत त्यावर नागरिकांच्या प्रतिक्रिया मागवल्या. विकास प्रकल्पांच्या सामाजिक-पर्यावरणीय परिणामांचे कायदेशीर मूल्यमापन आणि देशामध्ये कोणताही औद्योगिक अथवा पायाभूत सुविधेचा प्रकल्प उभा राहण्याआधी त्यातील लोकसहभागाचे नियोजन करण्याकरिता सन १९९४ पासून ही अधिसूचना एक महत्त्वाचे साधन बनली आहे.

जनहित लक्षात घेता 'ईआयए' अधिसूचनेच्या मसुद्यामध्ये पुढील मुद्यांच्या संदर्भात सुधारणा होऊन काही बाबींचा पुनर्विचार व्हावा, अशी आमची पर्यावरण मंत्रालयाला विनंती आहे.

कार्यवाहीनंतरही मंजुरी (The post-facto grant) नवीन प्रस्तावात औद्योगिक प्रकल्पांना 'आधी काम सुरू करा मग परवानगी मागा' या तत्त्वावर 'ईआयए'चा अर्ज करता येणार आहे, म्हणजे, बांधकाम, उत्खनन, औद्योगिक उत्पादन इत्यादींद्वारे - आवश्यक परवानग्या न घेता 'ईआयए'च्या तरतुदींनुसार कायदेशीर केले जाऊ शकते. कायदेशीर प्रक्रिया न करता, विनापरवाना अथवा बेकायदेशीररीत्या जे प्रकल्प संरक्षित क्षेत्रात सुरू करण्यात आले आहेत, अशा प्रकल्पांसाठी सोयीच्या तरतुदी या मसुद्यात केलेल्या दिसतात. त्यांचे मूल्यांकन करून, मंजुरी देऊन त्यांना काम चालू ठेवण्यास सांगता आले असते.

या तरतुदीमुळे उद्योगांना मंजुरीची तसदी न घेता कामकाज सुरू करण्यास प्रोत्साहन मिळण्याची शक्यता आहे आणि शेवटी दंडाची रक्कम भरून नियमित केली जाण्याची शक्यता आहे. यामुळे पर्यावरणीय उल्लंघनात प्रचंड वाढ होऊ शकते. एकदा निसर्गात हानी झाली तर त्यात परिवर्तन होण्यासाठी प्रचंड काळ जाऊ शकतो. त्यामुळे ही तरतूद 'प्रीकॉशनरी प्रिन्सिपल' म्हणजे सावधगिरीच्या तत्त्वाच्या विरोधात आहे. या तरतुदीचे एक उदाहरण पूर्वेतील ॲमेझॉन म्हणून ओळखले जाणारे आसाममध्ये डेहिंग पत्काई या ठिकाणी दिसते. इथे अनेक वर्ष अवैध कोळसा उत्खनन चालू आहे, ज्यामुळे हे जंगल लयाला गेले आहे. आजही त्याला सशर्त 'पोस्ट फॅक्टो' मंजुरी देण्यात येत आहे.

### जनसुनावणीच्या वेळेतील कपात

जनसुनावणीची प्रक्रिया 'ईआयए'चा एक महत्त्वाचा घटक मानला जातो. 'ईआयए' प्रक्रियेचा एक भाग

म्हणून संस्थेला सविस्तर योजना सादर करावी लागते, ज्यात त्यांच्या प्रस्तावित पायाभूत सुविधा प्रकल्पाचा एखाद्या क्षेत्रावर लक्षणीय परिणाम होण्याची भीती असल्यास त्याचे स्वरूप, गरज, संभाव्य प्रभाव आणि दुरुस्तीच्या उपाय योजनांचा तपशील देणे आवश्यक आहे. प्रस्तावित कायद्यात जनसुनावणीसाठी असलेला कालावधी कमाल ४० दिवसांपर्यंत कमी करण्यात आला आहे. तसेच कोणत्याही अर्जावर वा पर्यावरणविषयक परवानगीसंबधी आपला प्रतिसाद नोंदविण्यासाठी लोकांना देण्यात आलेला ३० दिवसांचा कालावधी २० दिवसांचा करण्यात आला आहे. कालावधीत केलेल्या या कपातीमुळे ज्या प्रदेशात लोकांना सहज माहिती उपलब्ध होत नाही अथवा ज्या प्रदेशातील लोकांना या प्रक्रियेची जाण नाही, अशा लोकांसाठी गंभीर प्रश्न निर्माण होऊ शकतात. प्रकल्पाच्या मंजुरी आधी स्थानिक जनतेला त्याची माहिती मिळून त्याचे भविष्यातील पर्यावरणीय परिणामाची आकडेवारी मांडून अवघ्या २० दिवसांत तक्रार नोंदविणे केवळ अशक्य आहे. शिवाय वेगवेगळ्या क्षेत्रातील स्वयंसेवी संस्थांना एकत्र जमून एखाद्या मुद्यावर चर्चा करून आपली हरकत नोंदवायची असेल, तर २० दिवस हा फार कमी कालावधी आहे.

### मोठ्या प्रकल्पांना सुनावणीतून वगळले

नव्या मसुद्यात 'ईआयए'च्या व्याप्तीतून ४० विविध प्रकारच्या उद्योगांना पूर्व पर्यावरणीय मंजुरीची गरज नसणार आहे. त्याच बरोबर नाव अनेक मोठ्या प्रकल्पांना सार्वजनिक सुनावणीतून वगळण्यात आले आहे, तसेच कोणत्या प्रकल्पांसाठी जनसुनावणी आवश्यक आहे, हे ठरविण्याचा अधिकार असलेली तज्ज्ञांची नवी समिती गठित करण्यात आली आहे. हे तर लोकशाहीच्या तत्त्वाच्या थेट विरोधात आहे!

### काही क्षेत्रातील प्रकल्पांची 'स्ट्रॅटेजिक' म्हणजे 'धोरणात्मक' म्हणून घोषणा

'ईआयए'च्या व्याप्तीतून वागळलेल्या यादीत 'स्ट्रॅटेजिक' असे लेबल असलेल्या प्रकल्पांचा समावेश आहे. अशा प्रकल्पांची कोणतीही माहिती सार्वजनिक क्षेत्रात ठेवली जाणार नाही, असेही या मसुद्यात म्हटले



आहे. सीमाभागातील रस्ते आणि पाइपलाइनसारख्या रेखीव प्रकल्पांनाही यादीतून सूट देण्यात आली आहे. सीमा क्षेत्राची व्याख्या भारताच्या सीमेवरील देशांच्या प्रत्यक्ष नियंत्रण रेषेपासून १०० किलोमीटरच्या आत पडणारे क्षेत्र अशी करण्यात आली आहे, जी ईशान्येचा बराचसा भाग व्यापू शकते. १,५०,००० चौरस मीटरपर्यंतच्या पुढील बांधकाम प्रकल्पांना 'ईआयए'च्या नियमांमधून सूट दिली जाईल. याशिवाय सर्व अंतर्गत जलमार्ग आणि राष्ट्रीय महामार्ग प्रकल्पांना पूर्वमंजुरीतून सूट देण्यात आली आहे. कोणते प्रकल्प 'धोरणात्मक' आहेत किंवा एखादा प्रकल्प 'धोरणात्मक' आहे, हे कसे ठरविण्यात यावे, याबद्दल स्पष्टीकरण देण्यात यावे.

### पर्यावरणविषयक मान्यता / परवानगीच्या वैधता कालावधीत वाढ

प्रकल्पाला एकदा मिळालेली मान्यता वैध असण्याचा कालावधी या नव्या मसुद्यात वाढवण्यात आला आहे. खाणकाम प्रकल्पासाठी सध्या असलेला ३० वर्षांचा कालावधी आता ५० वर्षे करण्यात आला आहे, तर नदी खोऱ्यातील प्रकल्पांची पर्यावरणविषयक मान्यता सध्या १० वर्षे वैध होती, आता तो कालावधी १५ वर्षांपर्यंत वाढवण्यात आला आहे. या काळात

अशा प्रकल्पांकडे दुर्लक्ष झाल्यास, त्यामुळे होणाऱ्या पर्यावरणीय, सामाजिक आणि आरोग्यविषयक परिणामांचा धोका वाढतो.

उद्योगांना केवळ वर्षातून एकदाच 'अनुपालन अहवाल' (compliance report) देण्याची मुभा

यापूर्वी उद्योगांना आपल्या प्रकल्पाचा अनुपालन अहवाल वर्षातून दोनदा द्यावा लागत असे. त्याऐवजी आता तो वर्षातून एकदाच देण्याची मुभा त्यांना देण्यात आली आहे. यामुळे प्रकल्पाच्या पर्यावरणीय तपशीलात अधिक त्रुटी राहू शकतील आणि त्यातून पळवाटा काढल्या जाण्याची शक्यता आहे. अहवाल देण्याचा कालावधी वाढवल्याने या काळातील महत्त्वाच्या पर्यावरणीय, सामाजिक आणि आरोग्यविषयक परिणामांकडे दुर्लक्ष होऊ शकते.

अशा प्रकारे 'ईआयए' अधिसूचनेच्या मसुद्यात अनेक आक्षेपार्ह मुद्दे आहेत, त्यात बदल केले जाणे अत्यावश्यक आहे. आज जगभरातील शास्त्रज्ञ इशारा देत आहेत की, जागतिक तापमान वाढ, प्रदूषण, कमी होणारी जैवविविधता, समुद्राचे आम्लीकरण, त्सुनामी आणि चक्रीवादळ अशा गोष्टीतून पृथ्वीची सजीवसृष्टी पोसण्याची क्षमता कमी होत चालली आहे. आपल्याला निसर्ग पूर्णपणे कळलेलाच नाही, हे आज वारंवार जाणवते. त्यामुळे प्रस्तावित 'ईआयए'मधून लोकशाहीच्या तत्त्वांचे उल्लंघन होऊ न देता सावधगिरीच्या तत्त्वावर (प्रीकॉशनरी प्रिन्सिपल) आधारित तरतुदी करणे हाच सुज्ञपणा ठरेल.

पर्यावरण मंत्रालय लोकांच्या आणि निसर्गाच्या पर्यावरणीय आणि सामाजिक सुरक्षेमध्ये आपली भूमिका अधिक ठोसपणे बजावेल, अशी आशा आहे.

*डॉ. गुरुदास नूलकर 'सिम्बायोसिस आंतरराष्ट्रीय विद्यापीठा'मध्ये प्राध्यापक असून 'इकॉलॉजिकल सोसायटी' (पुणे) या संस्थेचे विश्वस्त आहेत. तसेच ते शाश्वत विकास आणि पर्यायी अर्थव्यवस्था या विषयांचे अभ्यासक आणि लेखक आहेत.*

**इमेल : gurudasn@gmail.com**

## निवेदन

**प्रिय वाचक,**

आम्हाला ठाऊक आहे की नेहमीप्रमाणे याही महिन्यात आपण पर्यावरण व ग्रामीण विकासास समर्पित 'वनराई' अंकाची अतिशय आतुरतेने वाट पाहात असाल; परंतु इच्छा असूनही सध्याच्या एकूण परिस्थितीमुळे ऑगस्ट अंकाची छापील प्रत आपल्यापर्यंत पोहोचवणं शक्य होणार नाही. म्हणूनच आपली आतुरता अधिक न वाढवता '**पर्यावरण प्रभाव मूल्यांकन**' (**ईआयए**) या विषयावरील ऑगस्ट अंकाची इ-आवृत्ती आपल्यापर्यंत पोहोचवत आहोत. हा अंक जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचवल्यास, तसेच अंकाविषयीचा अभिप्राय व अपेक्षा ७७२००५६७३८/ editor@vanarai.org यावर संपर्क साधून लिखित स्वरूपात कळवल्यास आम्हाला आनंदच होईल. निवडक अभिप्रायांना योग्य माध्यमातून प्रसिद्धी देण्यात येईल.

**'वनराई मासिक वाचूया, निसर्ग-पर्यावरण वाचवूया!'**

आपला,
**रवींद्र धारिया,**
अध्यक्ष, वनराई